गुरुवार, दि. १७ जुलै २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३४१ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

शेतकऱ्यांच्या हक्काच्या निधीचा अपहार

## नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पात २०० कोटींपेक्षा अधिक रकमेचा घोटाळा - सुरेश गवळी

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यात जागतिक बँकेच्या सहाय्याने २०१८ पासून सुरू असलेल्या नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पात मोठ्या प्रमाणावर शासकीय अनुदानाचा गैरवापर झाल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणात तत्कालीन उपविभागीय कृषि अधिकारी तथा प्रभारी प्रकल्प संचालक श्रीमती शीतल आशिष चव्हाण (माकर) यांच्यावर थेट २०० कोटींहून अधिक रकम`च्या भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप सुरेश दामोदर गवळी यांनी एका पत्रकार परिषदेत केले आहे. या पत्रकार परिषदेला अॅड. गणेश कोल्हे, देवराज डोंगरे, सुरज येडगुलवार आदींची उपस्थिती होती.

७० शेड्युलरमध्ये १००% दोषी कृषि आयुक्तालय, पुणे येथील दक्षता पथकाने जुलै व सप्टेंबर २०२३ मध्ये केलेल्या चौकशीत ७० शेड्युलर योजनांमध्ये गंभीर अनियमितता झाल्याचे म्हटले आहे. या तपासणीत शीतल चव्हाण ह्या १०० टक्के दोषी असल्याचे ते यावेळी म्हणाले. दाषी असल्यानंतरही मार्च २०२४ मध्ये त्यांना नियमबाह्य पद्धतीने पदोन्नती देण्यात आली आणि कारवाईऐवजी संरक्षण दिल्याचा आरोप त्यांनी केला.

**सुरेश गवळी यांच्या पत्रकार परिषदेतील महत्त्वाचे मुद्दे घोटाळ्याचे प्रमुख प्रकार**

शेडनेटमध्ये बनावट अनुदान व चुकीचे जिओटॅगिंग:
एका गावातच २०१ शेडनेटम धून ३७ शेडनेटचे जिओटॅगिंग गावाच्या बाहेरचे.
दुसऱ्यांच्या शेडनेटवर फोटो काढून अनुदान उचलले गेले.
संपूर्ण जिल्ह्यात अशा प्रकारांद्वारे ५० कोटींहून अधिक रकमेचा अपहार.

**प्रशिक्षणाचे बनावट प्रम णपत्र:**
शेडनेट अनुदानासाठी आवश्यक असलेल्या प्रशिक्षणाचे बनावट प्रमाणपत्रे तयार करून सुमारे ३०० प्रकरणांमध्ये ४० कोटींचे अनुदान वाटप.

**शासकीय युजर आयडी व पासवर्डचा दुरुपयोग:**
शेतकऱ्यांसाठी वापरायचे युजर आयडी कंत्राटी लोक आणि पुरवठादारांकडे सोपवले गेले. यामुळे बोगस प्रकरणांना सहजतेने अनुदान मंजूर.

NON-ISI दर्जाचे उपकरण वापरून अनुदान:
HTP पंप, फॉगिंग यंत्रणा इत्यादी छ्जछ-खड्ख उपकरणांसाठी अनुदान मंजूर. शासनाला अंदाजे १-२ कोटी रुपयांचे नुकसान.

**आयशर वाहन घोटाळा:**
गोदाम नसतानाही ९५% प्रकरणांत आयशर वाहनांसाठी अनुदान मंजूर. कागदोपत्री बॉडीवर्क दाखवून प्रत्येक गाडीसाठी ३ ते १८ लाखांच्या बनावट खर्चावर आधारित अनुदान.

**अवजारे बँक योजनेतील अपहार:**
एकाच घटकासाठी तुकड्यांम ध्ये २० लाखाच्या आत प्रकल्प दाखवून अनुदान उचल.
काही शेड जुन्या बांधकामाचे दाखवून दुहेरी अनुदान.
उपकरणे फोटोसाठीच आणून नंतर परत करण्यात येत होती.

**सूक्ष्म सिंचनात बनावट वितरण:**
आवश्यक परिशिष्ट (५३, ५४, १) नसतानाही अनुदानासाठी शिफारस. वस्तू वितरण न करताही खात्यावर पैसे जमा.

**चौकशी थांबवण्याचे प्रयत्न व मंत्रीस्तरावरील हस्तक्षेप**
सप्टेंबर २०२४ मध्ये श्रीमती चव्हाण यांना निलंबित करण्यात आले. २४ सप्टेंबर २०२४ रोजी शासनाने गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले होते. मात्र, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी श्री. गहिनीनाथ कापसे यांनी कारवाई केली नाही. यावरही १० ऑक्टोबर २०२४ रोजी आदेश रद्द करण्यात आले, हे प्रकरण शासनातल्या वरिष्ठ पातळीवर दाबण्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.



**एकूण अपेक्षित नुकसान**
शेडनेट: ५०-६० कोटी
प्रशिक्षण घोटाळा: ४० कोटी
NON-ISI साहित्य व उपकरणे: २ कोटी
आयशर वाहन घोटाळा: २०-२५ कोटी
अवजारे बँक: १५-२० कोटी
सूक्ष्म सिंचन: ३० कोटी
इतर योजनांतील अपहार: २५-३० कोटी
एकूण अंदाजे नुकसान: २०० कोटींपेक्षा अधिक

**तक्रारदाराची मागणी**
सामाजिक कार्यकर्ता सुरेश दामोधर गवळी यांनी पुढील मागण्या शासनाकडे सादर केल्या आहेत:
संपूर्ण प्रकरणी फौजदारी गुन्हे दाखल करावेत
दोषींवर प्रशासकीय व आर्थिक वसुलीची कारवाई करण्यात यावी
चौकशी लांबवणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी
शेतकऱ्यांच्या नावावर अनुदान काढून त्यांचा आणि शासनाचा विश्वासघात करणाऱ्या अधिकाऱ्यांवर जर वेळेवर कारवाई झाली नाही, तर लोकशाही व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होईल, अशी प्रतिक्रिया अनेकांनी व्यक्त केली आहे.

## सांडपाणी व्यवस्थापनाचा प्रश्न ऐरणीवर

गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** तालुक्यातील मुरुमखेडा गावातील रहिवासी मिर्झा शौकत अन्वर बेग यांनी आपल्या घरासमोरील सांडपाणी व बाथरूम च्या पाण्याचा निचरा योग्य पद्धतीने करण्याची मागणी गटविकास अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. मागील काही महिन्यांपासून घरासमोरील सांडपाणी व बाथरूममधील पाणी शास्त्रोक्त पद्धतीने वाहून नेण्याची व्यवस्था न झाल्यामुळे परिसरात दुर्गंधी, अस्वच्छता आणि रोगराईचे संकट ओढावले असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

**ग्रामसेवक आणि सरपंचांकडे तक्रार करूनही दुर्लक्ष**
अर्जदार मिर्झा शौकत अन्वर बेग यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे की, दिनांक ०९ मार्च २०२५ रोजी ग्रामसेवक व सरपंच मुशमखेडा यांना या समस्येबाबत लेखी तक्रार सादर करण्यात आली होती. मात्र, आजपर्यंत कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. परिणामी त्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना दररोज दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे.

**पावसाळ्यात वाढलेला त्रास**
सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने सांडपाणी व पावसाचे पाणी थेट घरासमोर साचत आहे. त्याम ुळे डास, मच्छरांचा प्रचंड उपद्रव वाढला असून, डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांचा धोका निर्माण झाला आहे. यासोबतच परिसरातील लहान मुलांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे.

**सांडपाणी वाहून नेण्यासाठी काढलेली गटारी चोकअप**
अर्जात नमूद केल्याप्रमाणे, ग्रामपंचायतीने पूर्वी सांडपाणी वाहून नेण्यासाठी **पान २ वर**

### युवा आदर्श

**सत्ता देवी ...**

मोट बांधली तिघांत
नव्हते काही सरळ
सत्ता देवी आकर्षक
सकला घाले भुरळ
भिन्न स्वभावाचे सर्व
गुंतून पडले जवळ
पेईंग गेस्ट राहू लागे
नाईलाजाने केवळ
आवड जरी विभीन्न
एकत्र खाती कवळ
कशी करणार दोस्ती
मनात असता गरळ
निवडणूका दारांमधे
सुटली जोरां वावटळ
शक्ती परिक्षा दाखवा
फाटाफूट जरा अटळ
जागा वाटप वादावादी
उन्हाळी लागे भोवळ
पडाय लागली पिवळ
तजेलदार ती हिरवळ
राज कारणी नेहमीचे
उठणार चक्री वादळ
विध्वंस अधिक बहुत
भिडते आपट आदळ
पाहता पाहता पहावे
गुरफटून गेले सकळ
तिघांनी बसायचे कसे
पुरेना फाटली वाकळ

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

लेखी आश्वासनांतर आत्मदहन मागे; संघर्ष कायम

## मुल्यांकनाचा प्रश्न सोडविण्याबाबत पहिले सकारात्मक पाऊल - राठी



**जालना । प्रतिनिधी -** आमदार अर्जुनराव खोतकर, जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, उपविभागीय अधिकारी रामदास दौंड आणि उपविभागीय पोलीस अधिक्षक अनंत कुलकर्णी यांची सकारात्मक भूमिका आणि बाधित शेतकऱ्यांची एकजुट कामी आली असून, बाधीत जमिनीच्या मुल्यांकनाचा प्रश्न मार्गी लावण्याच्यादृष्टीने आज बुधवारी (ता. १६) पहिले सकारात्मक पाऊल पडले आहे, असे प्रतिपादन या आंदोलनाचे प्रमुख दिलीप राठी यांनी येथे केले. आ. अर्जुनराव खोतकर यांनी मध्यस्थी करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांना आत्मदहन आंदोलनाचे गांभीर्य लक्षात आणून दिले.

### समाधान होत नाही तोपर्यंत आंदोलन थांबणार नाही

मुल्यांकनाबाबत लवकरच तोडगा काढला जाईल असे पत्र जिल्हाधिकाऱ्यांनी दिले असले तरीही गाफिल न राहता शेवटच्या शेतकऱ्याचे समाधान होत नाही, त्याला योग्य न्याय मिळत नाही तोपर्यंत हे आंदोलन शांततेच्या व लोकशाही मार्गाने सुरुच राहणार असून, सर्वांनी पुर्वीसारखे दररोज आंदोलनस्थळी उपस्थित रहायचे आहे, असे आवाहन श्री. राठी यांनी यावेळी केले.

जालना-नांदेड समृध्दी महामार्ग बाधित शेतकऱ्यांचे आपल्या न्याय-हक्कासाठी गेल्या ७६ दिवसांपासून धरणे आंदोलन सुरु असून, त्यांनी आज सामुहिक आत्मदहनाचा इशारा दिल्याने शासन-प्रशासनाच्या काळजाचा ठोका चुकला होता, असे सांगून श्री. राठी पुढे म्हणाले की, आज काही धोरणात्मक तोडगा निघाला नसता तर खरोखर महाराष्ट्राच्या कपाळी डाग लागला असता. मात्र, उपविभागीय पोलीस अधिक्षक अनंत कुलकर्णी यांनी आंदोलनाच्या पहिल्या दिवसापासून शेतकऱ्यांना न्याय मि ळावा यादृष्टीने दुआ म्हणून भूमिका बजावली. जालना जिल्ह्यातील पाचही आमदार महायुतीचे असताना आ. अर्जुनराव खोतकर सोडले तर बाकीचे चार आमदार आंदोलनस्थळी फिरकले देखील नाहीत. केवळ खोतकरांनी सत्ताधारी पक्षात असूनही बाधित शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शासन दरबारी आवाज उठविला. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देत नाही तोपर्यंत एक इंचही जागेवर काम होवू देणार नाही, असा इशारा खोतकरांनी आंदोलनाच्या पहिल्या दिवसापासून दिला होता. त्यातच काल रात्रीपासून श्री. खोतकर सातत्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री पंकजाताई मुंढे आणि जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या तसेच आंदोलनकर्त्यांच्या संपर्कात होते. बाधित शेतकऱ्यांनी कोणतेही टोकाचे पाऊल उचलु नये म्हणून सतत समुपदेशन करीत होते, असे सांगून श्री. राठी पुढे म्हणाले की, अडचणीच्या काळातच कोण आपले आणि परके कोण हे कळते. गेल्या ७६ दिवसातील आंदोलनात कोणी-कोणी साथ दिली, कोणी-कोणी मज्जा पाहिली, कुणी मेखा मारुन ठेवल्या हे कळून सर्वांना कळून चुकले आहे. आज काही अघटीत घडले असते तर या आंदोलनाचा **पान २ वर**

### युद्धपातळीवर प्रयत्न करुन न्याय दिला जाईल - रामदास दौंड

बाधित शेतकऱ्यांच्या सामुहिक आत्मदहन आंदोलनामुळे अनुचित प्रकार घडून गालबोट लागु नये म्हणून आपण सर्वतोपरी प्रयत्न केले असून, बाधित शेतकऱ्यांवर आंदोलन करण्याची वेळच येऊ नये, असा आपला प्रयत्न राहिल. काल जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत श्री. राठी यांनी सविस्तरपणे जे मुद्दे मांडले त्याबाबत आम्ही सकारात्मक आहोत. जोपर्यंत पुर्ण तोडगा निघत नाही तोपर्यंत उपविभागीय अधिकारी कार्यालय बाधीत शेतकऱ्यांसाठी २४ तास खुले असून, मी स्वतः बाधित शेतकऱ्यांसाठी पाहिजे तेव्हा उपलब्ध राहिल, अशी ग्वाही उपविभागीय अधिकारी रामदास दौंड यांनी येथे बोलताना दिली. यापुढेही बाधित शेतकऱ्यांनी टोकाची भूमिका न घेता जिल्हा प्रशासनावर विश्वास ठेवावा. लवकरात लवकर आपल्या मागण्यांबाबत सकारात्मक तोडगा काढण्यात येईल, असा शब्दही त्यांनी दिला. सर्वसाधारणपणे मुल्यांकनाबाबत शासनाने कायद्यानुसार धोरण ठरवलेले असून, बाधित शेतकऱ्यांच्या मुल्यांकनाच्या विषयांवर युध्दपातळीवर अहवाल पाठवण्याचे काम सुरु आहे. शासनाकडून मार्गदर्शन मागवून त्या पध्दतीने जिल्हा प्रशासन काम करील. आजच्या सामुहिक आत्मदहन आंदोलनाच्या निमित्ताने बाधित शेतकऱ्यांनी एकजुटीचे दर्शन घडविले असून, आंदोलन स्थगीत करुन जिल्हा प्रशासनाला सहकार्य केले आहे. प्रशासनाला शासनाकडून मार्गदर्शन आल्यानंतर युध्दपातळीवर प्रयत्न करुन न्याय दिला जाईल. तोपर्यंत बाधित शेतकऱ्यांनी संयम बाळगावा, असे आवाहनही श्री. दौंड यांनी यावेळी केले.

# संपादकीय

## शुभांशूने रचला इतिहास; ऑक्सिऑम मोहीम फत्ते

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकातील (आयएसएस ) १८ दिवसांच्या वास्तवानंतर आणि २२.५ तासांच्या प्रवासानंतर भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला ऑक्सिऑम ४ मोहिमेतील आपल्या तीन सहकाऱ्यांसह मंगळवारी पृथ्वीवर सुरक्षित परतले आणि इतिहास घडला. शुभांशू शुक्ला पृथ्वीवर परतताच त्याच्या कुटुंबासह संपूर्ण देशात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. शुभांशू शुक्ला पृथ्वीवर परतण्याचा क्षण देशवासीयांसाठी अभिमानाचा क्षण होता. शुभांशू शुक्ला आपली मोहीम फत्ते करून पृथ्वीवर परत आले हा क्षण १४० कोटी भारतीयांनी आपल्या मनात साठवून ठेवला. शुभांशू शुक्ला सुरक्षित परत आल्याने १४४ कोटी भारतीयांना 'अंतराळ ठेंगणे झाले' असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. शुभांशू हे भारताचे दुसरेच अंतराळवीर आहेत. या आधी विंग कमांडर राकेश शर्मा यांनी ४१ वर्षापूर्वी अंतराळाला गवसणी घातली होती त्यानंतर आता तशी कामगिरी करणारा शुभांशू हा पहिलाच आणि देशातील केवळ दुसरा अंतराळवीर ठरला आहे. भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला २५ जून रोजी ऑक्सिऑम मिशन ४ अंतर्गत आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाकडे रवाना झाले होते. शुभांशू शुक्ला हे या मोहिमेचे पायलट होते. भारतीय वेळेनुसार दुपारी २५ जून रोजी दुपारी १२ वाजता फ्लोरिडा येथील नासाच्या केनेडी स्पेस सेंटरवरून हे मिशन लॉँच करण्यात आले होते . सर्व अंतराळवीरांनी स्पेसएक्सच्या फाल्कन-९ रॉकेटशी जोडलेल्या ड्रॅगन कॅप्सूलमध्ये उड्डाण केले. ड्रॅगन अंतराळयान २६ जून रोजी दुपारी ४.३० वाजता सुमारे २८.५ तासांनंतर आयएसएसशी जोडले गेले. अमेरिकन अंतराळ संस्था नासा आणि भारतीय एजन्सी इस्रो यांच्यातील करारानुसार, भारतीय हवाई दलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांची या मोहिमेसाठी निवड करण्यात आली होती.

**मोहिमेचे उद्दिष्ट -** ऑक्सिऑम ४ या मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट अंतराळात संशोधन करणे आणि नवीन तंत्रज्ञानाची चाचणी करणे हे होते. हे अभियान खाजगी अंतराळ प्रवासाला प्रोत्साहन देणारे देखील होते आणि भविष्यात व्यावसायिक अंतराळ स्थानक ( ऑक्सिऑम स्टेशन) बांधण्याची योजना असलेल्या ऑक्शन स्पेस प्लॅनिंगचा एक भाग होता.

**वैज्ञानिक प्रयोग -** सूक्ष्म गुरुत्वाकर्षणात विविध प्रयोग करणे.

**तंत्रज्ञान चाचणी -** अवकाशात नवीन तंत्रज्ञानाची चाचणी आणि विकास.

**आंतरराष्ट्रीय सहकार्य -** विविध देशांतील अंतराळवीरांना व्यासपीठ प्रदान करणे.

**शैक्षणिक उपक्रम -** अवकाशातून पृथ्वीवरील लोकांना प्रेरणा देणे आणि जागरूकता पसरवणे.

**शुभांशू शुक्ला कोण आहेत ?**

शुभांशू यांचा जन्म १९८६ मध्ये उत्तर प्रदेशातील लखनौ येथे झाला. त्यांनी राष्ट्रीय संरक्षण अकादमी (एनडीए) मधून शिक्षण घेतले. ते २००६ मध्ये हवाई दलात सामील झाले आणि लढाऊ विमाने उडवण्याचा अनुभव आहे. त्यांची निवड इस्रोच्या गगनयान मोहिमेसाठीही झाली आहे, जी भारताची पहिली मानवी अंतराळ मोहीम आहे. अंतराळवीर होण्यासाठी त्यांनी रशिया आणि अमेरिकेत विशेष प्रशिक्षण घेतले. यामध्ये त्यांनी सूक्ष्म गुरुत्वाकर्षण, आपत्कालीन हाताळणी आणि वैज्ञानिक प्रयोगांमध्ये काम करायला शिकले.

**शुभांशू शुक्ला यांनी आयएसएसवर काय केले ?**

शुभांशू १४ दिवस तिथे राहिले आणि त्यांनी ७ प्रयोग केले, जे भारतीय शैक्षणिक संस्थांनी तयार केले आहेत. यापैकी बहुतेक जैविक अभ्यास आहेत, जसे की अंतराळातील मानवी आरोग्यावर आणि जीवांवर होणारा परिणाम पाहणे. याशिवाय, त्यांनी नासासोबत आणखी ५ प्रयोग केले, जे दीर्घ अंतराळ मोहिमांसाठी डेटा गोळा करणारे आहेत. या मोहिमेत केलेले प्रयोग भारताच्या गगनयान मोहिमेला बळकटी देणारे ठरतील. शुभांशूचा हा अनुभव २०२७ साली नियोजित असलेल्या गगनयान मोहिमेसाठी उपयुक्त ठरेल. त्यांनी आणलेला डेटा आणि अनुभव भारताच्या अंतराळ कार्यक्रमास पुढे नेण्यास मदत करू शकेल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## २१ जुलै रोजी पेंशन अदालत

**जालना -** छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयातील आस्थापना उपायुक्त यांनी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या तक्रारी निकाली काढण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्यानूसार पेंशन अदालत दि.२१ जुलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जालना जिल्हा परिषदेतील उपमुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य यांच्या दालनात आयोजित करण्यात आली आहे.

आपली प्रकरणे पेंशन अदालतीमध्ये ठेवण्यासाठी सेवानिवृत्तांनी प्रलंबित प्रश्न, अर्ज, पोस्टाने, ई-मेल किंवा हस्तपोच जिल्हा परिषदेतील सामान्य प्रशासन विभागात दि.१८ जुलै २०२५ पर्यंत सादर करावेत. तरी पेंशन अदालतीसाठी सेवानिवृत्तांनी, कुटुंबनिवृत्ती वेतन धारकांनी प्रकरणाच्या माहितीसह उपस्थित रहावे, असे आवाहन उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# पर्यटकांचा इतर सहली सोबतच डार्क टुरिझमकडे जास्त ओढ

देश स्वतंत्र करण्यासाठी अनेक क्रांतिकारक,शुरवीर योध्दा यांनी आपले प्राणपणाला लावुन देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. सोबतच इंग्रजांचे अत्याचार सुध्दा सहन केले.अशा अनेक स्वतंत्र पुर्वकाळातील गाथा,स्मारके देशात आहेत ती आपण कदापि विसरू शकत नाही आणि विसरणार सुध्दा नाही.यात जालियनवाला बाग,अंदमान कारागृह इत्यादीसह अनेक स्थळे आहेत त्यांना पर्यटक भेट देत असतात.यानंतर स्वातंत्र्योत्तर काळातील भोपाळ गॅस दुर्घटना स्मारक, पंजाबमधील ऑपरेशन ब्लू स्टार राबविण्यात आलेली जागा कारगिलमधील युध्द स्मारके, मुंबईत २६ नोव्हेंबर २००८ साली झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील ठिकाणे असे अनेक स्वतंत्र पुर्वकाळातील व स्वतंत्र काळातील ऐतिहासिक ठिकाणे पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र असतातच.परंतु गेल्या काही वर्षांतल्या भयावह दुर्घटना किंवा हिंसाचाराच्या घटनांच्या स्थळांनाही पर्यटक आवर्जून भेट देत असल्याचे दिसून येते आणि द्यायलाच पाहिजे. परंतु सध्याच्या परिस्थितीत वाढत्या दुर्घटनांचा जनु काय ओघ लागला की काय असे दिसून येते. त्यामुळे या दुर्घटना ग्रस्त ठीकाणांना आजचा पर्यटक भेट देणे जास्त पसंत करतो.कारण दुर्घटना कशी झाली असावी?का झाली असावी? अशा अनेक आश्चर्यकारक घटना दिसून येतात.अशा अनेक प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी किंवा माहिती गोळा करण्यासाठी किंवा कोणी विचारले तर सांगता यावे की आम्ही त्या भयावह दुर्घटनांचे ठिकाणे आम्ही पाहिल्या.म्हणजेच दुःखद किंवा शोकांतिका ठिकाणांना भेट देणे यालाच डार्क टुरिझम म्हणतात.या डार्क टुरिझमकडे सध्याच्या परिस्थितीत पर्यटकांचा वाढता शौक मोठ्या प्रमाणात दिसून येते.यामध्ये अनेक ठिकाणे आहेत अहमदाबाद विमान दुर्घटनाग्रस्त इमारत, मुंब्र्यातील अरूंद रेल्वे रूळ, केरळमधील वायनाडमधील दरड कोसळून २३० हून अधिक जणांचा मृत्यू झाला तो परिसर, चेंगराचेंगरीचे ठिकाणे अशाप्रकारे अनेक दुर्घटनास्थळे, दहशतवादी हल्ल्यांच्या ठिकाणांचे डार्क टुरिझमकरण्याकडे कल वाढत चालला असून अहमदाबाद त्याचे ताजे उदाहरण आहे.या सहली फक्त मनोरंजनासाठी नसून भावनिक आणि शैक्षणिक हेतूही त्यामागे असतो.अशाप्रकारच्या डार्क टुरिझममध्ये दहा टक्क्यांनी वाढ झाल्याचे सांगितले जाते.मुख्यत्वेकरून डार्क टुरिझम म्हणजे मानवी मृत्यू, संहार, युध्द, दुर्घटना, यांच्याशी संबंधित ठिकाणी भेट देणे किंवा तेथील पर्यटन करणे, यालाच डार्क टुरिझमअसे म्हटले जाते.सांगायचे तात्पर्य म्हणजे पर्यटक मनोरंजनात्मक ठिकाण व स्वतंत्रपुर्व काळातील स्मारकांना भेट देतातच सोबत दुर्घटनाग्रस्त(डार्क टुरिझम) भागांना सुध्दा भेट देतात. त्यामुळे पर्यटकांचा ओघ डार्क टुरिझम वाढल्याचे दिसून येते.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# जालना व बीड माध्यमिक शिक्षण विभागातील रिक्त जागा भराव्यात

मराठवाडा शिक्षक संघाचे निवेदन



**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** जालना व बीड माध्यमिक शिक्षण विभागातील रिक्त जागांमुळे शिक्षकांची अनेक कामे खोळंबून पडली आहेत. त्यामुळे शिक्षकांमधे प्रचंड असंतोष व चिड निर्माण झाली आहे. त्याची दखल घेऊन या दोन्ही जिल्हय़ातील माध्यमिक शिक्षण विभागातील रिक्त जागा ताबडतोब भराव्यात अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम यांनी शिक्षण उपसंचालक छत्रपती संभाजीनगर यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या बाबत अधिक माहिती अशी की, मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम व छत्रपती संभाजीनगर जिल्हा सचिव भाई चंद्रकांत चव्हाण यांनी शिक्षण उपसंचालक मा. प्रकाश मुकुंद साहेब, शिक्षण उपसंचालक छत्रपती संभाजीनगर यांची भेट घेऊन मागण्यांचे निवेदन सादर केले. बीड व जालना माध्यमिक शिक्षण विभागात अनेक जागा रिक्त असल्याची बाब निदर्शनास आणली. या दोन्ही जिल्हय़ातील सेवानिवृत्ती विभागात कर्मचारी नाही. त्यामुळे सेवानिवृत्त प्रस्ताव पाठविणे व मंजूर होवून आलेल्या सेवानिवृत्ती प्रस्तावावर पुढील कार्यवाही होण्यास विलंब होत आहे परिणामी सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेले व सेवानिवृत्त झालेले शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी अडचणीत आले आहेत. बीड येथे लिपिकाचे पद रिक्त असल्याने सर्व कार्यालयीन कामकाज ठप्प झाले आहे. जालना माध्यमिक शिक्षण विभागात उपशिक्षणाधिकारी व अधिक्षक ही पदे रिक्त असल्याने अडचणी निर्माण होत आहेत. या दोन्ही जिल्हय़ातील वेतन पथक कार्यालयातही जागा रिक्त असल्याचे शिक्षण उपसंचालक साहेब यांच्या निदर्शनास आणून दिले. एवढ्या मोठ्या प्रमाणावर जागा रिक्त असल्याने कामाचा खोळंबा वाढला आहे. परिणामी शिक्षकांमधे प्रचंड असंतोष व चिड निर्माण झालेली आहे. याची ताबडतोब दखल घेऊन या रिक्त जागा भराव्यात अन्यथा तीव्र आंदोलनाचा ईशारा देण्यात आला आहे.

## वाचकांचे मनोगत

### मुंबई महानगरपालिका खेळाडूंचे प्रतिक महानगरपालिका क्रीडा भवन

मुंबई महानगरपालिका क्रीडा भवन शंभराच्या उंबरठ्यावर आहे.१९२६ साली तत्कालीन महानगरपालिका आयुक्तांनी लावलेल्या रोपट्याचा कल्पवृक्ष झाला आहे.क्रीडा भवनाचे सभासद हे मुंबई महानगरपालिकेचे कर्मचारी ,अधिकारी यांना होता येते.असे साधारण बारा हजारांहून अधिक सभासद आहेत. क्रीडा भवन स्वायत्त संस्था आहे. आर्थिक उलाढाल लाखो रूपयांची असून क्रीडा भवनाचे व्यवस्थापन खेळाडूंनी निवडणूकीत निवडून दिलेल्या उमेदवारांची कार्यकारिणी स्थापन होऊन मानद सचिवां मार्फत वेगवेगळ्या खेळांचे मानद सचिव निवडले जातात. साधारण बारा पेक्षा अधिक खेळ मुंबई महानगरपालिका क्रीडा भवनात खेळले जातात. महानगरपालिका आयुक्त पदसिद्ध अध्यक्ष आहेत. तर दोन उप आयुक्त उपाध्यक्ष आहेत. एकूण सतरा सदस्यांची कार्यकारिणी आहे.क्रीडा भवनाचा स्वतःची घटना , नियम व नियमावली आहे.त्यानुसार क्रीडा भवनाचे प्रशासकीय कामकाज केले जाते. मागील पंधरा वर्षांपासून क्रीडा भवनाचे कामकाज प्रशासकाच्या ताब्यात आहे.या कालावधीत ना सर्वसाधारण सभा झाल्या ना वार्षिक अर्थसंकल्पाचा ताळेबंद खेळाडूंची मासिक फी ,आजीव सभासद यांच्याकडून येणाऱ्या पैशांचा हिशोब सभासदांपुढे आणला गेला नाही.आता तर क्रीडा भवनाच्या जागेवर महापालिका प्रशासन नगर सभागृह,वाहनतळ, रुफ टॉप ,काचेची कॅप्सूल लिफ्ट, व्ह्यूंग गॅलरी,कॅफेटेरिया आदी गोष्टी उभारणार असल्याचे वर्तमानपत्रातून समजले.मग,खेळाडूंच्या, सभासदाच्या पैशाचे काय? मुंबई महानगरपालिका खेळाडूंनी मुंबई महानगरपालिकेचे नाव जगाच्या नकाशावर उमटवले आहे.आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत भारताच्या विविध खेळात क्रीडा भवनाच्या खेळाडूंचा समावेश होतो. क्रीडा भवनाच्या शिवाजी पार्क येथील शाखेची जागा प्रशासनाने महापौर बंगल्यासाठी आरक्षण बदलले. त्या बदल्यात अजून क्रीडाभवनास पर्यायी जागा मिळालेली नाही.क्रीडा भवन कर्मचाऱ्यांची तेथे निवासस्थाने होती.त्यांच्याकडून २९ ऑगस्ट २०२२ रोजी रिकामी करून घेण्यात आली.महापालिका प्रशासनाने क्रीडा भवन खेळाडूंची निवडणूक घेऊन त्यांच्या ताब्यात देऊन क्रीडा भवनाचा शतक महोत्सव साजरा करावा.

**महादेव गोळवसकर**
**कुर्ला मुंबई, ९८६९४७६२०९**
mahadeogolvaskargmail.com

पान १ वरुन

## मुल्यांकनाचा प्रश्न ...

प्रमुख अर्थात गेल्या अडीच महिन्यापासून सर्वजण मिळून एकत्र राहिल्याने त्यांचा कुटूंबप्रमुख म्हणून स्वतःला आयुष्यभर माफ करु शकलो नसतो, असे सांगताना श्री. राठी यांचा कंठ दाटून आला होता.

यावेळी बोलताना श्री. राठी पुढे म्हणाले की, काही बाधित शेतकऱ्यांनी आवश्यक ती सर्व कागदपत्रे आणि पुरावे दाखल करुनही त्यांना न्याय न देता एकतर्फी निवाडे करण्यात आले असून, ही संबंधित अधिकाऱ्यांची घोडचूक असल्याने हे निवाडे रद्द करुन नव्याने निवाडे करण्याच्यादृष्टीने श्री. दौंड यांनी प्राधान्याने प्रयत्न करावेत. तसेच जिल्हा प्रशासनाने मुल्यांकनाबाबत जो काही निर्णय घ्यायचा तो त्यांच्या स्तरावरच घ्यावा. कारण लवादात जाण्याची आमची कोणाचीच तयारी नाही. जिल्हा प्रशासनाने थोडी सकारात्मक भूमिका घेवून योग्य न्याय दिल्यास सर्व शेतकरी संमती देतील. पर्यायाने कुणीही लवादात जाणार नाही आणि महाराष्ट्रात हा नवीन पॅटर्न जालना पॅटर्न म्हणून नावारुपाला येईल. त्यामुळे स्थानिक पातळीवरच बाधित शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा. शेतकरीही दोन पाऊले मागे घ्यायला तयार आहेत. प्रशासनाने सकारात्मक विचार करुन मोठ्या मनाने बाधित शेतकऱ्यांच्या मागण्या लवकरात लवकर मार्गी लावाव्यात, अशी मागणी श्री. राठी यांनी यावेळी केली.

सकाळी ११ वाजेच्या दरम्यान डिवायएसपी अनंत कुलकर्णी आणि एसडीएम रामदास दौंड यांनी बाधीत शेतकऱ्यांचे प्रमुख दिलीप राठी आणि ॲड. गोपाल मोरे यांच्याशी बराच वेळ चर्चा केली. मुख्यमंत्री जिल्हाधिकाऱ्यांशी बोलले असून, लवकर तोडगा निघेल, अशी माहिती उभयतांनी दिली. मात्र, जिल्हाधिकारी मुल्यांकनाच्या प्रश्नावर शासन-प्रशासन गंभीर असल्याची भूमिका लेखी स्वरुपात मांडत नाहीत तोपर्यंत आंदोलनातून माघार नसल्याचे श्री. राठी यांनी स्पष्ट सांगितले. त्यामुळे श्री. दौंड हे परत जिल्हाधिकारी कार्यालयात गेले. तेथे जिल्हाधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केल्यानंतर आंदोलकांना अपेक्षित मजकूर असलेले रास्त मुल्यांकन काढण्याबाबतचे पत्र घेवून श्री. दौंड हे आंदोलनस्थळी आले. यावेळी महसुल अधिकारी संदिप डेंबडे आणि आर्थिक गुन्हे शाखेचे अंबादास साबळे यांनी आंदोलन स्थगित करण्याची विनंती केली असता श्री. राठी आणि ड. मोरे यांनी उपस्थित आंदोलकांशी सल्लामसलत केल्यानंतर आजचे सामुहिक आत्मदहन आंदोलन स्थगित करीत असल्याचे जाहिर केले. तथापि, रास्त मुल्यांकनासह इतर मुद्यांवर जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत शांततेच्या मार्गाने आंदोलन सुरुच राहणार असल्याचे उभयतांनी जाहिर केले आणि शासन-प्रशासनासह सर्वांचाच जीव भांड्यात पडला.

पहिल्यांदाच शेतकऱ्यांच्या न्याय-हक्कासाठी जिल्ह्यातील व्यापाऱ्यांनी भरभरुन पाठिंबा दिला. गवळी समाज, मुस्लिम समाज, माहेश्वरी समाज, अखिल भारतीय मराठा महासंघ, छत्रपती फाऊंडेशन, युवा सेना या व इतर सामाजिक संघटनांनी आंदोलनाला सक्रीय पाठबा देत बाजारपेठ कडकडीत बंद ठेवली. हातावर काम करणारे मुस्लिम बांधव मुळात कोणत्याही बंदमध्ये सहभागी होत नाहीत. मात्र, मुस्लिम समाजातील फिरोजलाला तांबोळी, शेख वसीम, अब्दुल रशीद पहेलवान, मेहमुद पहेलवान यांनी काल दिलेल्या शब्दाला जागत आजच्या बंदमध्ये सहभागी होण्याचे आवाहन मुस्लिम समाजाला केले होते. त्यामुळे मुस्लिम बांधवांनी बंदमध्ये शंभर टक्के सहभाग नोंदविला. व्यापारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष विनीत साहनी यांच्यासह मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड ण्ड कॉमर्सचे उपाध्यक्ष संजयकुमार दाड आणि शामसुंदर लोया यांच्यासह व्यापारी महासंघाचे पदाधिकारी विजय बी. राठी, दामोधर बजाज, जुगलकिशोर बजाज यांनी सकाळपासूनच बाजारपेठ बंद ठेवण्याबाबत व्यापाऱ्यांना प्रोत्साहित केले. बाजारपेठेत फेरफटका मारल्यानंतर हे सर्वजण आंदोलनस्थळी येवून तोडगा निघण्याची वाट पहात होते. त्यासाठी प्रशासन आणि आंदोलनकर्त्यांना प्रोत्साहित करीत होते. त्याचबरोबर औषधी संघटनेचे जिल्हाध्यक्ष साईनाथ पवार, जिल्हा सचिव जितेंद्र लखोटिया, तालुकाध्यक्ष तुकाराम डोंगरे, पदाधिकारी सुनील शेळके, विनोद काबरा, शिवाजी बजाज यांच्यासह ज्येष्ठ व्यापारी संजय लव्हाडे, योगेश पाटणी, सुभाष झंवर यांनीही आंदोलकांचे मनोबल उंचावण्यासाठी प्रयत्न केले.

अखिल भारतीय मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांच्यासह अंकुश राजगिरे, शुभम टेकाळे हे शहरभर फिरुन व्यापाऱ्यांना बंदचे आवाहन करीत होते. त्याचबरोबर हिंदू महासभेचे धनसिंह सुर्यवंशी यांनीही व्यापाऱ्यांना बंदमध्ये सहभागी होण्याबाबत आवाहन करतानांच आंदोलनस्थळी भेट दिली.

**आंदोलनातुन अघटीत घडू नये म्हणून आमचे प्रयत्न- कुलकर्णी**

बाधित शेतकरी आणि प्रशासनात दुआ म्हणून भूमिका बजावणारे उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी म्हणाले की, आज धरणे आंदोलनाच्या ७६ व्या दिवशी बाधित शेतकऱ्यांची आक्रमकता पाहून काही तरी अघटीत होईल, असे आंदोलनाचे नेतृत्व करणारे दिलीपजी राठी यांच्यासह पोलीस प्रशासनालाही वाटले होते. मात्र, सन्मानजनक तोडगा काढण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांसह उपविभागीय अधिकारी, तहसिलदार आणि मी स्वतः प्रयत्नशिल होते. आमच्या प्रयत्नांना यश आल्याचे समाधान वाटते, असे सांगून श्री. कुलकर्णी पुढे म्हणाले की, बाधित शेतकऱ्यांच्या रास्त मागण्यांबाबत प्रशासनाकडून सकारात्मक हालचाली सुरु झाल्यानेच येथुन पुढील वाटचाल आक्रमक न ठेवता शांततेत आणि लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचे आश्वासन श्री. राठी यांनी दिले असल्याने आम्ही आता निश्चित आहोत. जिल्हाधिकारी आणि उपविभागीय अधिकाऱ्यांकडून लवकरच बाधित शेतकऱ्यांच्या प्रश्नांची सोडवणूक होईल. शेतकऱ्यांनी गेल्या ७६ दिवसांपासून कायदा व सुव्यवस्थेला गालबोट लागू न दिल्यानेच आंदोलनकर्त्यांचे आम्ही आभारी आहोत. लोकशाही मार्गाने न्याय-हक्कासाठी लढा उभारणे हा प्रत्येकाचा अधिकार असून, ज्या संयमाने बाधित शेतकऱ्यांनी आपल्या मागण्यांबाबत आंदोलन केले ते कौतुकास पात्र आहे, असे श्री. कुलकर्णी म्हणाले.

## सांडपाणी व्यवस्थापनाचा ...

काढलेली सडसडीत गटारी गाळामुळे चोकअप झाली आहे. त्यामुळे पाणी साचून राहत असून, दुर्गंधीचे प्रमाण वाढले आहे. याचा परिणाम गावातील स्वच्छतेवर आणि नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे.

**प्रशासनाने तातडीने लक्ष घ्यावे**

या समस्येचा त्वरित बंदोबस्त करावा, तसेच सांडपाणी व बाथरूम पाण्याचा निचरा होईल अशी योग्य व्यवस्था करावी, अशी मागणी अर्जदार मिर्झा शौकत अन्वर बेग यांनी केली आहे. यासोबतच इतर ग्रामस्थांनीही प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे आणि तातडीने सांडपाणी व्यवस्थापनासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.

**ग्रामसेवक व सरपंच यांची भूमिका संशयास्पद**

सदर अर्जावर दोन वेळा तक्रार करूनही ग्रामसेवक व सरपंच यांच्याकडून अद्यापही कोणतीही कार्यवाही न झाल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष घालून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणीही ग्रामस्थांतून होत आहे.

# शंभर शिक्षक क्लब तर्फे सोपान पाष्टे यांचा सत्कार



**धाकलगांव । प्रतिनिधी -** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त जालनाच्या शंभर शिक्षक क्लबतर्फे राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धे चे अंबड तालुक्यातील दाडेगाव येथील जिल्हा परिषद शाळेतील सहशिक्षक सोपान पाष्टे सर यांनी जिल्ह्यातून तृतीय क्रमांक पटकावला आहे त्याबद्दल त्यांचा अंबड तालुक्यातील गट शिक्षण अधिकारी सिंगारे सर यांच्यातर्फे सत्कार करण्यात आला त्यावेळी दाढेगांव जिल्हा परिषद शाळांचे मुख्याध्यापक संजय नाझरकर सर व सहकारी शिक्षक वर्ग उपस्थित होते.

# भारज येथे विठ्ठल सोनवणे चेअरमन तर व्हाईस चेअरमन पदी राजेश दौलतराव दामोधर यांची बिनविरोध निवड

**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** जाफराबाद तालुक्यातील भारज बु येथील आर्यादिदि ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित भारज बु या संस्थेच्या संचालक मंडळाची निवडणूक गेल्या पंधरा दिवसांपूर्वी बिनविरोध पार पडली होती त्यामध्ये विठ्ठल जयराम सोनवणे तर राजेश दौलतराव दामधर गजानन लक्ष्मण बेराड संजय रामचंद्र बेराड साबीरखा पठाण गणेश सोनवणे रामकिसन तारू मंगला गायकवाड उषा सोनवणे हे संचालक मंडळ बिनविरोध निवडून आलेले आहे सहकार विभागाच्या प्रणाली नुसार पंधरा दिवसानंतर संचालक मंडळ चेअरमन पदी आणि व्हाईस चेअरमन पदी निवडायचे असतात त्या अनुषंगाने वरील सर्व संचालक मंडळाने कुशल आणि सर्व गुण संपन्न असलेली तरुण तडफदार नेतृत्व म्हणून चेअरमन पदी विठ्ठल जयराम सोनवणे व व्हाईस चेअरमन पदी राजेश दामोधर यांची सौखुशीने आनंदाने आणि एकमताने निवड केली आहे या नवनिर्वाचित संचालक मंडळाचे चेअरमन यांचे भारज परिसरात अभिनंदन होत आहे शाखा व्यवस्थापक गोपाल गायकवाड सामाजिक कार्यकर्ते सिताराम वाघ कीर्तनकार हभप बंडू महाराज महानोर सामाजिक कार्यकर्ते राजू डबे उपस्थित होते.



**झाडे लावा**
**झाडे जगवा**

# विप्र फाउंडेशनचे अध्यक्ष श्रीमाली आणि सचिव व्यास यांचा जेपीसी बँकेतर्फे सत्कार



**जालना । प्रतिनिधी -** विप्र फाउंडेशन शाखा जालनाचे नूतन अध्यक्ष जयप्रकाश श्रीमाली आणि सचिव विजयकुमार व्यास यांचा जालना पीपल्स बँकेच्यावतीने चेअरमन संजय मुथा यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी बँकेचे संचालक ॲड. अनिल संचेती, नारायण दायमा, अशोक शर्मा, चंदन श्रीमाली, संजय भरतीया, राजकुमार दायमा, सुनील चौधरी, सुनील मोदी, किशोर देवीदान, सुभाष वाघमारे, अशोक जोगड़, चंद्रकांत शेलगावकर, पुरुषोत्तम पोलास, पवन जोशी, सुरेश शर्मा, विलास जाधव, राम निवास गौड, भगवान दायमा आदींची उपस्थिती होती.

या प्रसंगी सरकारला उत्तर देताना विप्र फाउंडेशनचे अध्यक्ष जयप्रकाश श्रीमाली म्हणाले की, समाजहितासाठी कार्य करताना आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकास या तिन्ही अंगांवर भर दिला जाणार आहे. विप्र समाजाने सर्व क्षेत्रात आपली ओळख निर्माण केली आहे. ही ऊर्जा आणि एकजूट संघटित उपक्रमांतून समाजाच्या उन्नतीसाठी वापरणे, हे आमचे मुख्य ध्येय राहील. संस्थेच्या माध्यमातून नव्या पिढीला प्रेरणा देणारे कार्यक्रम, कौशल्य विकास, व्यावसायिक सल्ला आणि सामाजिक संलग्नता वृद्धिंगत करणारे उपक्रम राबवले जातील असे ते म्हणाले आणि वाढदिवसानिमित्त त्यांनी संजय मुथा यांना विप्र फॉउंडेशनच्यावतीने शुभेच्छा दिल्या.

# काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष शेख महेमुद राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार?

**जालना । प्रतिनिधी -** काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष शेख महेमुद यांनी काँग्रेस पक्षाचा राजीनामा दिला असून ते गुरूवार दिनांक १८ जुलै रोजी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रवेश करणार आहेत.

शेख महेमुद यांनी ३० वर्षे काँग्रेसमध्ये विविध पदावर कार्य केले असून जालना विधानसभा तसेच लोकसभा, नगर पालिका निवडणुकीत त्यांनी अथक परिश्रम घेत पक्षाला यश मिळवून देण्यात सिंहाचा वाटा उचलला आहे. फुले- शाहू- आंबेडकर चळवळीचे ज्येष्ठ कार्यकर्ते म्हणून त्यांनी सामाजिक सद्भावना वाढीसाठी विविध उपक्रम राबवले आहेत. जालना शहरात मुस्लिम- दलित - ओबीसी फोरमच्या माध्यमातून त्यांनी महापुरुषांच्या विचाराची पेरणी करून जालना शहरातील मुस्लिम- दलित- ओबीसी समाजात महापुरुषांच्या विचाराची नवीन फळी निर्माण केली आहे.

जालना शहरातील काँग्रेसचे स्थानिक नेतृत्व हे भाजप विचारसरणीचे आहे, ही बाब आपण पक्षश्रेष्ठींकडे तक्रार करुन निदर्शनास आणून दिली आहे, मात्र पक्षश्रेष्ठींने आपल्या तक्रारीकडे दुर्लक्ष केले असल्याचे शेख महेमुद यांनी सांगितले.राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे धर्मनिरपेक्ष विचारधारेचे असल्याने आपण राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. आपण काँग्रेस पक्षाच्या आपल्या पदाचा राजीनामा प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याकडे सुपूर्द केला असून राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत व



राष्ट्रवादी काँग्रेसचे जालना जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांच्या नेतृत्वात गुरूवार दिनांक १८ जुलै रोजी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार असल्याचे शेख महेमुद यांनी सांगितले.

दरम्यान, शेख महेमुद यांच्या काँग्रेस पक्षाच्या सोडचिठ्ठीने आगामी महापालिका तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत काँग्रेस पक्षाला मोठा फटका बसणार असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

# टेंभुर्णीत शेतकरी अमृततुल्य चहा



**जाफ्राबाद । प्रतिनिधी-** तालुक्यातील टेंभुर्णी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शेतकरी अमृततुल्य चहाचा पसरली जिल्हाभर दरवळ ( टेंभुर्णी प्रतिनिधी ) टेंभुर्णी जवळच असलेल्या आंबेगाव येथील गरीब शेतकरी राजेंद्र भीमराव गायके व त्यांचा मुलगा गोपाल गायके या शेतकरी कुटुंबाने येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक भाले कॉम्प्लेक्सच्य गाळ्या मध्ये उभा केला नवीन व्यवसाय सुरू जालना ते जाफराबाद रोडवर अमृतुल्य चहाचा व्यवसाय सुरू शेतकरी अमृततुल्य चहाची गोडी सर्व दूर पसरली आहे या शेतकऱ्याकडे चार एकर शेती कोरडवाहू जमीन आहे शेतीमध्ये पाहिजे तसे उत्पन्न मिळत नसल्याने काहीतरी स्वतःच्या जीवावर लहान सहान व्यवसाय सुरू करावा अशी मनामध्ये प्रश्न होता ते स्वप्न सत्यात उतरले टेंभुर्णी टेंभुर्णी येथे शेतकरी अमृततुल्य चहाचे व्यवसाय केले गोपाल गायके यांच्या दुकानात शहरातील प्रवासी मुद्दाम थांबून चहाचा आस्वाद घेत आहे या चहाची गोडी आमदार संतोष पाटील दानवे यांच्या अर्धांगिनी रेणुताई दानवे यांच्या हस्ते हॉटेल चे उद्घाटन करण्यात आले पुष्पाताई शालिकराव म्हस्के शोभाताई मतकर कविता खोत राजु खोत कोकीळाबाई पंडीत भाले सुवर्णा सुनील भाले दत्तु पंडीत मधुकर गाढे राजु चव्हाण टेंभुर्णी ग्रामसेवक जगदीश आढाव सरपंच गौतम म्हस्के संजय राऊत भिकन पठाण प्रदिप भोपळे सरपंच बाबासाहेब सवडे धीरज सवडे बिडी सवडे सोमनाथ अंधारे यांची उपस्थिती होते.

# रोजगार हमी योजनेअंतर्गत प्रलंबित निधी तत्काळ वितरीत करा

## खासदार डॉ. कल्याण काळे यांची शासनाकडे आग्रही मागणी

**जालना । प्रतिनिधी -** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मनरेगा) सन २०२१-२२ पासून प्रलंबित असलेल्या वैयक्तिक व सार्वजनिक कामांच्या निधीबाबत खासदार डॉ. कल्याण काळे यांनी आज मा. आयुक्त (मनरेगा), महाराष्ट्र शासन यांना नागपूर येथे पत्र देऊन तातडीने निधी वितरीत करण्याची मागणी केली आहे.

या पत्रात त्यांनी स्पष्ट केले आहे की, जालना व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांतील शेतकरी व अन्य लाभार्थ्यांचे कुशल कामांचे बिले गेली अनेक वर्षे प्रलंबित असून, शेतकऱ्यांनी केलेल्या सिंचन विहिरी, शेततळे, फळबाग लागवड, गायगोठा यांसारख्या वैयक्तिक कामांचा मोबदला अद्याप मिळालेला नाही. त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत असून, शासनाविषयी नाराजी वाढत आहे.

जालना जिल्ह्यातील प्रलंबित कामांचा आढावा:

वैयक्तिक कामे - ६०८४ (रु ३२६६.८५ लक्ष)

सार्वजनिक कामे - १४३६ (रु ११२०२.८३ लक्ष)

एकूण कामे - ७५२० । एकूण निधी मागणी - रु १४४६९.६९ लक्ष

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील प्रलंबित कामांचा तपशील:

वैयक्तिक कामे - १६६५८ (रु १८२१८.३८ लक्ष)

सार्वजनिक कामे - १२४५ (रु ८९९७.६८ लक्ष) एकूण कामे - १७९०३ । एकूण निधी मागणी - रु २७२१६.०६ लक्ष

एकूण दोन्ही जिल्ह्यांतील निधी मागणी: रु ४१६८५.७५ लक्ष (४१६ कोटींपेक्षा अधिक)

खासदार डॉ. काळे यांनी पत्रात नमूद केले आहे की, लाभार्थी शेतकरी व ग्रामीण जनता दररोज तक्रारी घेऊन येत असून, निधी न मिळाल्याने त्यांच्या समस्या अधिकच गंभीर होत आहेत. रोजगार हमी योजनेविषयी प्रसारमाध्यमांमध्ये सातत्याने नकारात्मक वृत्त येत असून, प्रशासनावरही दबाव वाढत आहे.

या पार्श्वभूमीवर त्यांनी शासनाकडे दोन्ही जिल्ह्यांचा प्रलंबित निधी तातडीने वितरीत करण्याची आग्रही मागणी केली आहे, जेणेकरून लाभार्थ्यांना दिलासा मिळेल आणि योजनेवरील विश्वास टिकून राहील.

# जवान सतीश पेहरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

**जाफराबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील वरुड (बु.) येथील शहीद जवान सतीश पेहरे यांच्या स्मारकावर स्मृती दिनानिमित्त आदरांजली वाहण्यात आली. १४ जुलै रोजी सकाळी ११ वाजता वीरमाता, वीरपिता, वीरपत्नी व त्यांच्या कुटुंबीयांसमवेत तहसील कार्यालयाच्या वतीने लहाने व पोलीस प्रशासनाच्या वतीने पोलीस निरीक्षक सतीश जाधव व माजी सैनिक संघटना जिल्हाध्यक्ष तथा शिवसेना तालुकाप्रमुख कुंडलिक मुठे यांनी स्मारकावर पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली. 'जाफराबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सतीश जाधव यांनी शहीद जवान सतीश पेहरे यांच्या विषयी मनोगत व्यक्त केले. यावेळी पोलिस निरीक्षक सतीश जाधव, पोलीस उपनिरीक्षक रजधर पठाडे, सहायक पोलीस उपनिरीक्षक मोरे, हे.कॉ. महेश वैद्य, पो.कॉ. राम मोरे, तलाठी शिवाजी काळे, वीर पिता सुरेश पेहरे, वीरमाता अलकाबाई पेहरे, वीरपत्नी जया पेहरे, भीमराव नागरे, माजी सैनिक ताठे, साळवे, खरात यांच्यासह महिला व ग्रामस्थ उपस्थित होते. माजी सैनिक संघटनेचे जिल्हाअध्यक्ष कुंडलिक मुठे यांनी आभार मानले.




## विशेष बाल पोलीस पथकांचे बाल अधिकार विषयावर एक दिवसीय प्रशिक्षण संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** बाल न्याय मुलांची काळजी आणि संरक्षण अधिनियम २०१५ च्या प्रस्तावनेत नमुद केल्यानुसार बालकांसोबत काम करणाऱ्या सर्वच यंत्रणा बालस्नेही असणे गरजेचे आहे. या बाबीची अंमलबजावणी होण्यासाठी काळजी व संरक्षणाची गरज असणारी बालके व विधी संघर्षग्रस्त बालके यांच्या सामाजिक पुर्नएकात्मिकीकरण करण्याची प्रक्रिया बाल स्नेही वातावरणात व्हावी, या उद्देशपूर्तीकरीता पोलीस अधिकारी- कर्मचाऱ्यांनी प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांनी केले.

जिल्हा महिला व बाल विकास कार्यालय आणि होप फॉर दी चिल्ड्रेन फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१५ जुलै २०२५ रोजी विशेष बाल पोलीस पथक, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, चाईल्ड हेल्पलाईन १०९८, बाल कल्याण समिती, बाल न्याय मंडळ आदि सर्व यंत्रणांचे एक दिवसीय प्रशिक्षण पोलिस अधिक्षक कार्यालयात घेण्यात आले. प्रशिक्षणासाठी पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल, अपर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कोमल कोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रशिक्षणात बाल न्याय अधिनियम २०१५ नुसार विधी संघर्षग्रस्त बालके व काळजी व संरक्षणाची गरज असणारी बालके यांच्या सोबत अनुसरावयाची कार्यपध्दती तसेच लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण २०१२ या कायद्याबाबत प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणासाठी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणेमधील विशेष बाल पोलीस पथकातील अधिकारी-कर्मचारी, बाल न्याय मंडळाचे सदस्य, बाल कल्याण समिती सदस्य, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, चाईल्ड हेल्पलाईन १०९८ कक्षातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

प्रशिक्षण होप फॉर दि चिल्ड्रेन फाऊंडेशनचे व्यवस्थापक ङ परम आनंद, वसीम शेख, सहाय्यक व्यवस्थापक सचिन करंजुले यांनी दिले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन जिल्हा बाल संरक्षण अधिकारी गजानन इंगळे यांनी केले. असे प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## जालना जिल्ह्यात सरासरी ४.८० मि.मी. पावसाची नोंद

**जालना -** जिल्ह्यात दि. १६ जुलै २०२५ रोजी सकाळपर्यंतच्या मागील २४ तासात सरासरी ४.८० मि.मी एवढ्या एकूण पावसाची नोंद झाली आहे. जिल्ह्यात झालेल्या पावसाची तालुकानिहाय आकडेवारी मि.मी. मध्ये पुढीलप्रमाणे असून कंसातील आकडेवारी यंदाच्या एकूण पावसाची आहे. जालना- ३.७० (२७.०६), बदनापूर- ४.१०(३१.४५), भोकरदन- १५.१० (३८.९८), जाफ्राबाद- ८.७० (४०.५३), परतूर- १.४० (१३.३४), मंठा- ०.५०(१९.२२), अंबड- १.१० (१९.०८), घनसावंगी- ०.८० (१४.१८) मि.मी. पावसाची नोंद करण्यात आली आहे. जिल्ह्यात आज पर्यत एकुण २५.६७ मि.मी. एवढ्या पावसाची नोंद करण्यात आली आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ किल्ल्याचे युनेस्को तर्फे जागतिक वारसा म्हणून निवड झाल्याबद्दल परतूर भाजपा तर्फे आनंदोत्सव साजरा



**परतूर । प्रतिनिधी -** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ किल्ल्याचे युनेस्को तर्फे जागतिक वारसा (Heritage) म्हणून निवड झाल्याबद्दल परतूर भाजपा तर्फे आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

परतूरचे माजी मंत्री तथा विद्यमान आमदार बबनराव लोणीकर, भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या मार्गदर्शनात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

यावेळी उपस्थित सर्वांच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे धन्यवाद व्यक्त करून अभिनंदन करण्यात आले.

भाजप तालुका संघटन सरचिटणीस सावता काळे यांनी पुढे बोलतांना अखंड हिंदुस्तान आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मराठा लष्करी भूप्रदेश या संकल्पनेंतर्गत छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांचा जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश करण्यात आला. त्यांनी पुढे सांगितले की देशातील व महाराष्ट्रातील अनेक शिवप्रेमींची गेल्या अनेक वर्षापासून मागणी होती की महाराजांचा ज्वलंत इतिहास येत्या काळात विदेशातील शिवभक्त देखील महाराजांचा आदर्श घेतील, त्यासाठी देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब तसेच महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, परतूरचे माजी मंत्री तथा विद्यमान आमदार बबनराव लोणीकर, महाराष्ट्राचे युवा नेते राहुल भैया लोणीकर यांच्या यशस्वी प्रयत्नाने व देशातील कर्तबगार अधिकारी यांनी १२ किल्ल्यांच्या बाजूने जी २० मते मिळवून दिली त्याबद्दल सर्वांचे अभिनंदन केले.

ह्यावेळी भाजपा ज्येष्ठ नेते भगवान तात्या मोरे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विविध कार्याचा उल्लेख करत हा क्षण सर्वांसाठी गौरवाचा क्षण आहे असे मत व्यक्त केले.

यावेळी भाजपा ज्येष्ठ नेते ओमप्रकाश मोर, भाजपा व्यापारी आघाडी अध्यक्ष राजू म्हस्के, भाजपा व्यापारी आघाडी उपाध्यक्ष अजित पोरवाल, भाजपा तालुका उपाध्यक्ष ड सुरेश काळे, भाजपा शहर सरचिटणीस आनंद कोटेचा, भाजपा शहर उपाध्यक्ष अमोल अग्रवाल, अभिजित जोशी, गणेश अग्रवाल, मुन्ना चित्तोडा, गोविंद मोर, बंडू मामा नवल व नागरिक उपस्थित मोठ्या संख्येने उपस्थित होते.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.